# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 2267 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


## सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफ़िसर), मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा ,मुंबई.

**धारिका क्रमांक : बी.एम. १० (अ)(३)/१४४/दहा** **जाहिरात क्रमांक : १६३/२०११**

**आयोगामार्फत महापालिका आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त , मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा ,मुंबई.** पदाच्या एकूण **तेरा जागांसाठी** ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अमागास | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (चालू रिक्त पदे) १३ | ५ +२*+१ ☑ | -- | १* | १* | १ | १ | -- | -- | १ |

२.१ ( * **उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित पद, ☑ उपलब्ध असल्यास अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित** )

२.२. शासनाच्या अंतर्गत परिवर्तनियतेच्या धोरणानुसार वि.जा.(अ), भ.ज.(ब),भ.ज.(क) वर्गवारीच्या आरक्षित पदाकरिता संबंधित वर्गवारीचा योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), अथवा भ.ज.(ड) या पैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवारांचा विचार **गुणवत्तेच्या आधारावर** करण्यात येईल

२.३ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात महानगरपालिकेच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ विचाराधीन पदाकरिता अपगांसाठी पद आरक्षित नसले तरी , शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.संकीर्ण २००४ /६३९ / प्र.क्र.९६/०४/नवि २०, दि. १३ ऑगस्ट, २००४ नुसार. तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने १) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision) २)श्रवण शक्तीतील दोष् (hearing impairment) ३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) असे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत.

**३. वेतनश्रेणी** :- **रु.** १८६००-३९१०० + GRP ६६०० /- अधिक इतर भत्ते

**४. पात्रता** : -

४.१ **वय**- दिनांक **१ मार्च, २०१२** रोजी खुल्या प्रवर्गासाठी ४० व मागासप्रवर्गाकरिता ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२ शासन आदेशानुसार संबंधित आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४.३ मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.४ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. **परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत् नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध् उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च् शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

४.५. **शैक्षणिक अर्हता** :- Candidate must Possess a degree in Arts , Science, Law, Commerce, Medicine , or Engineering of recognised university or an equivalent qualification and thereafter

४.६. **अनुभव** :-

४.६.१ Have administrative ,executive or supervisory experience in a responsible capacity for not less than Five years in Government , Semi- Government or any big industrial or commercial concern.

४.६.२ Candidate should give details & submit evidence regarding administrative experience , supervisory experience or executive experience.

४.६.३ The experience of ex-armed force officers will be considered as supervisory experience for the duration they served in armed forces as commissioned officer.

**५. निवडीची पध्दत.**

**५.१. प्रस्तूत पदासाठी वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा दोन टप्यामध्ये सदर भरती प्रक्रिया घेण्यात येणार आहे. त्या करिता दिनांक ०८ जानेवारी २०१२ रोजी केवळ मुंबई क्रेंद्रावर सर्व उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे जाहिरातीतील विहित मूळ अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. सदर परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.**

**५.२. संबंधित वस्तुनिष्ठ परीक्षा ही २०० गुणांची ०२ तास कालावधीची राहील व त्यासाठी ३:१ गुणोत्तरात निगेटिव्ह गुणदान असेल. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारास किमान ३५% व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास ३०% गुण मिळवणे आवश्यक राहील. तसेच अपंग व गुणंवत्ताधारक खेळाडूकरिता २०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तथापि उमेदवारास वरीलपैकी कोणतीही एकच सवलत मिळेल. मुलाखतीसाठी १०० गुण राहतील व निवड होण्यासाठी त्यापैकी त्यातील किमान ४१ गुण मिळवणे आवश्यक राहील. अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारित असेल.**

६. **मुलाखतीच्या दिवशीच आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यांना मुदतवाढ मिळणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही.

**७. कर्तव्ये व जबाबदा-या:-**

७.१ प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७.२ विचाराधीन पदाकरिता शिफ़ारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची नियुक्ती झाल्यावर त्या उमेदवारांना विविध भागातील / खात्यातील कामकाजावर देखरेख ठेवणे व त्याचे नियंत्रण करणे सुलभ व्हावे आणि महानगरपालिकेच्या विविध खात्याच्या कामकाजाची माहिती मिळावी म्हणून सर्वसाधारणपणे ३ ते ४ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

९. **शुल्क** : (१) अमागास - रु.४१०/- (२) मागासवर्गीय रु. २१०/- (३) सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. (४) बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

१०. **अर्ज करण्याची पद्धत** :- (१) प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ ते दिनांक १४ डिसेंबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.(३)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक **आहे**.(५) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यानंतर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच पुढील प्रक्रिया करता येईल.

११.विहित पद्धतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी **चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १४ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे**. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. तसेच, **चलनाद्वारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १५ डिसेंबर,२०११ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.**

१२.चलनाद्वारे शुल्क बॅकेमध्ये भरल्यानंतर **बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID दिनांक १७ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे** त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१३.आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६ नोव्हेंबर २०११**

**नि.श.पटवर्धन**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**